आरोग्य सहाय्यक पुरुष गट क या पदाची पदोन्नती नाकारल्यामुळे सातव्या वेतन आयोगानुसार प्रदान केलेले आश्वासीत प्रगती योजनेचे लाभाचे आदेश रदद् करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद,
आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद आदेश क्र. कार्या-२/आस्था-३/ 9982/ — /२०२५,
अहिल्यानगर, दिनांक 20/ 12 /२०२५

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन,वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्रं.३/२०१९/ सेवा-३ दि.२ मार्च २०१९ मधील मुददा क्र.२० (३) मधील तरतुदीनुसार.
२.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही२०१५/ प्र.क.३०३/का.१२, दिनांक-१२/०९/२०१६
३.पदोन्नती गठीत समितीची दि.१७/०४/२०२५ रोजीची बैठक
४.दिनांक-१८/०८/२०२५ रोजीचे समुपदेशनाचे इतिवृत्त
५. या कार्यालयाकडील आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/ ७४२/२०२५, दिनांक- २२/०८/२०२५
६. श्री.अशोक मुरलीधर तेलोरे, आ.से. यांचा दिनांक- १९/०८/२०२५ रोजीचा अर्ज
७. श्री.तेजस भगवान थोरात, आ.से. यांचा दिनांक- २५/०८/२०२५ रोजीचा अर्ज
८. श्री.जयकुमार पोपटराव वाघमारे, आ.से. यांचा दिनांक- २५/०८/२०२५ रोजीचा अर्ज

आरोग्य सेवक (पुरुष) गट क या संवर्गातुन आरोग्य सहाय्यक (पुरुष) गट क या पदाची संदर्भ क्र. ६ ते ८ चे अर्जान्वये खालील आरोग्य सेवक (पुरुष) यांनी तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीस नाकार दिलेला आहे.

| अ नं | आरोग्य सेवक (पुरुष) नाव | सध्याचे कार्यालय | पहिला लाभ दिलेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.अशोक मुरलीधर तेलोरे | प्रा.आ.केंद्र- मिरी, ता.पाथर्डी | २-६-२०११ | पहिला लाभ मंजुर |
| २ | श्री.तेजस भगवान थोरात | प्रा.आ.केंद्र- मिरी, ता.पाथर्डी | ५-१-२०१२ | पहिला लाभ मंजुर |
| ३ | श्री.जयकुमार पोपटराव वाघमारे | प्रा.आ.केंद्र- विठा, ता.अकोले | ५-१-२०१२ | पहिला लाभ मंजुर |

उपरोक्त कर्मचारी यांनी आरोग्य सेवक (पुरुष) पदावरुन आरोग्य सहाय्यक पदावर पदोन्नती आदेश पारीत केल्यानंतर स्वखुशीने नकार दिलेला आहे. त्यामुळे संदर्भ क्रं.१ चे शासन निर्णयामधील मधील मुददा क्र.२० (३) मधील तरतुदीनुसार पहिला, दुसरा, तिसरा लाभ अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढुन घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

तसेच असे लाभ काढुन घेतल्यानंतर संबधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजुन, महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल. सदर कर्मचा-यांना देण्यात आलेले आश्वासीत प्रगती योजनेचे लाभ काढुन घेण्यात येत असुन या कर्मचा-यांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजुन, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

तसेच सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व सदर आदेश संबधितांच्या निदर्शनास आणुन देऊन स्वाक्षरीची प्रत दप्तरी दाखल करावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्र. 20251227100292 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-12-2025 12:09:26

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. ------------------------------------------ संबंधित आरोग्य सेवक (पुरुष)

व्दारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मिरी / विठा, ता.पाथर्डी / अकोले

२/- सदरचे आदेश संबंधितांचे मुळ सेवा पुस्तकात नोंदवून कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व नोंदीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत पुढील कार्यवाहीसाठी

१.वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र -मिरी / विठा, ता.पाथर्डी / अकोले

२.तालुका आरोग्य अधिकारी, पं.स. अ.नगर/अकोले/संगमनेर/नेवासा/पाथडी, जि.अ.नगर

प्रत माहितीस्तव

मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

स्वाक्षरीत

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर